दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ३३६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, गुरुवार, दि.१७ जुलै २०२५

**आजचा सुविचार**

आनंद ही अशी वस्तू आहे जी तुमच्याजवळ नसतानाही तुमची इच्छा असल्यास, तुम्ही ती दुसऱ्याला देऊ शकता.

## पोलिसांच्या वर्दीतील माणुसकीने जुना वाद संपुष्टात

### सामंजस्याची भूमिका, कौटुंबिक जिव्हाळा...




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड(नांदेड) :** तालुक्यातील बारड पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे यांनी वर्दीतील माणुसकी जोपासत अनेक वर्षांपासूनचे मालमत्तेचे जुने वाद सामंजस्याची भूमिका घेऊन मिटवली असून सख्खे भाऊ सखे वैरी यांच्यात पुन्हा बंधुत्व निर्माण केल्याने पुतणीच्या लग्नात काकांच्या कुटुंबाचा सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला असून पोलीस प्रशासनाची शिष्टाईने भाईचारा जोपासत एक आदर्श निर्माण केला आहे.

पोलीस खाकी वर्दीचं नाव काढलं की सर्वसामान्यांना भीती वाटत असते. दोघांच्या भांडणात एकावर गुन्हा नोंदविणे तर दुसऱ्या सोबत कायद्याचा वापर करून धाक दाखवणे याबाबतची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष नाराजी पहावयास मिळते. परंतु बारड पोलीस ठाणे यास अपवाद ठरले आहे. राजेश आदिनाथ बोंदार्डे, तसेच भारत आदिनाथ बोंदार्डे, या दोघांत सख्या भावंडांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मालमत्तेचा जुना वाद विकोपाला गेला होता. सखे भाऊ सखे वैरी बनल्याने एकमेकांच्या सुखदुःखात सुद्धा शामील होत नव्हते. या दोन्ही कुटुंबात विस्तव आडवा जात नव्हता. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर पुन्हा मालमत्तेच्या वाटण्याचा वाद विकोपाला गेला होता. यांमुळे अनेक वेळा भांडण तंटे, हाणामारीच्या घटनाही घडल्या आहेत. तंटामुक्ती गाव समिती पंच कमिटी यांनी अनेक वेळा वाद मिटवण्यासाठी प्रयत्न केले परंतु यश आले नाही. यापूर्वीही पोलीस ठाण्यात अधिकारी व कर्मचारी आले व गेले जे कोणालाही नाही जमले ते नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे यांनी करून दाखविले. दोन्ही भावांच्या मालमत्तेचा वाद पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने सुरुवातीस पोलीस प्रशासनाने वादाचे स्वरूप समजावून घेतले. यानंतर समोपचाराने वाद मिटवण्याचा प्रस्ताव ठेवला. यानंतर दोघांनीही सामंजस्याचा प्रस्तावास होकार दिला. आई वडील राहत असलेली जागा दोघांनीही समान प्रमाणात घेण्याचे मान्य केले. राजेश बोंदार्डे यांनी शेतातून तीस फुटाचा रस्ता भाऊ भारत बोंदार्डे यांना जाण्या येण्यासाठी खुल्ला करून द्यावा या तर जोडीचा लिखित प्रस्ताव विधी तज्ञ द्वारे पूर्ण करण्यात आला आहे. दोन्हीं भावातील जुनावाद अखेर पोलीस प्रशासनाने निकाली काढला असून पुतणीच्या विवाहात काकांचे कुटुंब मंगल कार्यात पाहव्यास मिळाल्याने बंधुत्व जोपासण्याची भूमिका वादग्रस्त कुटुंबासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## शिवशाही आणि दुचाकीचा भीषण अपघात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, सांगली :** सांगली ते पेठ या राष्ट्रीय महामार्गावरील फल्ले मंगलकार्यालयाजवळ दुचाकी आणि शिवशाही बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात मित्राला परीक्षा केंद्रावर सोडण्यासाठी सांगलीकडे निघालेल्या तरुणावर काळाचा घाला पडला आहे. त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. वृत्तानुसार, बुधवार सकाळच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. यामध्ये साहिल अंसारी मुलाणी (वय २२, रा. नागठाणे) या महाविद्यालयीन तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर त्याचा मित्र प्रतिक अनिल साळुंखे (वय १९, रा. बुरूड गल्ली, इस्लामपूर) हा गंभीर जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी जखमी प्रतिक याला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# सत्तेत यायचा स्कोप आहे! मुख्यमंत्र्यांची खुली ऑफर

## उद्धव ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया; म्हणाले...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी घडामोड आज पाहायला मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना भर सभागृहात सत्तेत येण्याची खुली ऑफर दिली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपला आहे. त्यांच्या निरोप समारंभात बोलताना फडणवीसांनी ठाकरेंना ही ऑफर दिली. सत्तेत येण्याचा स्कोप आहे, असे फडणवीस ठाकरेंना उद्देशून म्हणाले. यावर आता उद्धव ठाकरेंची प्रतिक्रिया समोर आली आहे.

**ऑफर नेमकी काय?**

देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले. 'अंबादास दानवे यांचा आज निरोप समारंभ आहे. आमच्या शुभेच्छा आहेत. त्यांनी पुन्हा या समारंभात यावं. आल्यानंतर त्याच पदावर असावं असं काही नाही. मी असं म्हटल्यावर हे म्हणतील की, पळवापळवी करतोय म्हणून. उद्धवजी! आता २०२९ पर्यंत काही स्कोप नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरलेला नाही. तुम्हाला इकडे यायचा स्कोप.. म्हणजे विचार करता येईल.' अशी खुली ऑफर दिल्याने साऱ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

विधानभवन परिसरात पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे म्हणाले, 'सभागृहात या गोष्टी खेळीमेळीने झाल्यात आणि त्या गोष्टी खेळीमेळीनेच घ्यायला हव्यात.' याचा अर्थ ठाकरेंनी ही ऑफर गंभीरपणे घेतल्याचे चित्र नाही. त्यामुळे राजकीय वर्तुळात तुर्तास या विषयाला पूर्णविराम मिळाला आहे.

हिंदुत्वाच्या मुद्द्यावरुन शिवसेना आणि भाजपची अनेक वर्ष युती होती. पण शिवसेना पक्षात फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे आणि भाजप यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत. पण आता खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना ऑफर दिली. पण ठाकरेंनी घेतलेली भूमिकेमुळे तुर्तास चर्चांना ब्रेक लागणार आहे.

दरम्यान, अंबादास दानवेंच्या निरोप प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीसांनी त्यांचे कौतुक केले. 'अंबादास दानवे हे मूळचे भाजपच्या मुशीत घडलेले कार्यकर्ते. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारे आणि कट्टर सावरकरवादी कार्यकर्ते म्हणजे दानवे. पण जागावाटपात विधानपरिषदेची जागा शिवसेनेला गेली. मग दानवेंना शिवसेनेत जावं लागलं.' असे फडणवीस म्हणाले.

## नागपुरात मराठीवरून वाद; FIR च्या हिंदी अनुवादावरून युनियन बँकेला मनसेचा दणका



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नागपूर :** राज्यात मराठी भाषा आणि तिच्या वापरावरून सुरू असलेल्या वादात आता नागपूर शहराचाही समावेश झाला आहे. नागपूरमधील यूनियन बँक ऑफ इंडिया शाखेत मंगळवारी मराठीच्या मुद्द्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या ( मनसे ) कार्यकर्त्यांनी दणका दिला. कामकाज ठप्प केलं. पोलिसांनी मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले, अखेर या प्रकरणी बँकेने दिलगिरी व्यक्त केली. या घटनेमुळे नागपूरसह राज्यभर मराठी भाषेच्या अधिकारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

ही घटना नागपूरच्या बेलतरोडी परिसरातील एका दुर्दैवी रस्ते अपघाताशी संबंधित आहे. योगेश बोपचे (वय ३५) या तरुणाचा ८ जून रोजी पहाटे अपघाती मृत्यू झाला. योगेशचे कोणतेही वैयक्तिक जीवनविमा पॉलिसी नसल्याने त्याच्या पत्नी आणि दोन लहान मुलांवर मोठे संकट कोसळले. मात्र, एका कौटुंबिक मित्राच्या माहितीवरून योगेशच्या कुटुंबीयांना कळले की, बँक खातेदार म्हणून अपघात मृत्यूवर दोन लाख रुपयांची विमा भरपाई मिळू शकते.

योगेशचा धाकटा भाऊ लोकेश बोपचे याने यूनियन बँकेत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बँकेच्या अधिकाऱ्यांनी बोपचे कुटुंबीयांना सांगितले की, पोलिसांनी दाखल केलेला एफआयआर हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवादित करून नोटराईज करावा लागेल, तेव्हाच क्लेम प्रक्रिया पुढे नेली जाईल. नागपूरच्या बेलतरोडी पोलिस स्टेशनचा एफआयआर मराठीत असल्याने बँक अधिकारी अर्ज स्वीकारायला तयार नव्हते.

या अटीमुळे बोपचे कुटुंबीयांनी मनसेकडे धाव घेतली. बुधवारी मनसेचे अनेक कार्यकर्ते बोपचे कुटुंबासह यूनियन बँकेत पोहोचले. 'मराठी हीच राज्याची भाषा आहे, मग एफआयआरचा हिंदी अनुवाद का?' अशा घोषणा देत मनसेने बँकेतील कामकाज ठप्प केलं. बँकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण दिलं की, विमा कंपनीचे मुख्यालय कोलकातामध्ये असून, तिथले अधिकारी मराठी समजत नाहीत. क्लेम प्रक्रियेसाठी हिंदी अनुवाद आवश्यक आहे.

**यूनियन बँकेने व्यक्त केली दिलगिरी**

मात्र, हे उत्तर नाकारत मनसेने आंदोलन अधिक तीव्र केलं. अखेर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतलं. यानंतर यूनियन बँकेने बोपचे कुटुंबीयांकडे आणि मनसेकडे दिलगिरी व्यक्त करत, क्लेम प्रक्रियेला गती देण्याचं आश्वासन दिलं. या प्रकरणामुळे केवळ बोपचे कुटुंबाच्या दुःखावर डोंगर कोसळला होता त्यात बँकेच्या धोरणाने अन्यायही सहन करावा लागला. भाषेच्या कारणाने गोरगरीब कुटुंबाची अडवणूक ही संतापजनक बाब आहे. अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## उद्धवजींसोबत जाऊया, मनसे नेत्यांचा सूर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नाशिक :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या इगतपुरी येथे सुरू असलेल्या अधिवेशनात अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यभरातून बोलाविलेल्या १२० पदाधिकाऱ्यांपैकी बहुसंख्य पदाधिकाऱ्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबत युती करण्याच्या बाजूने कौल असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या प्रश्नोत्तराच्या तासात अनेकांनी शिवसेना ठाकरे गटासोबत युती करावी, असे मत मांडले. परंतु, 'तुमच्या मनासारखं करू, पण थोडे थांबा,' असा सबुरीचा सल्ला राज ठाकरेंनी दिल्याचे समजते. तसेच आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठीचा मुद्दा आणि मतदारयादीवर लक्ष ठेवून निवडणुकीची तयारी करण्याचे धडेही ठाकरे यांनी बैठकीत दिले.

मराठीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे विजयी मेळाव्यात एकत्र आल्यानंतर दोन्ही पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी युती करण्याचा दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी युतीबाबत मंथन करण्यासाठी इगतपुरीत राज्यातील निवडक १२० पदाधिकाऱ्यांसोबत सोमवारपासून एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बंद दाराआड चर्चा सुरू केली आहे. मुंबईतील सर्व विभागीय अध्यक्ष, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूरसह राज्यातील पदाधिकाऱ्यांशी राज ठाकरे यांनी मंगळवारी प्रश्नोत्तराचा तास घेतला. तुम्हाला प्रत्यक्ष कामकाज करताना 'फिल्ड'वर काय अडचणी येतात, आगामी पालिका निवडणुका लक्षात घेऊन मराठी व मतदारयादीमधील गोंधळाचा मुद्दा लक्षात ठेवून कशा पद्धतीने कामकाज करायचे, याबाबतचे धडे राज यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीत पदाधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारण्याचीही संधी दिली. त्यावेळी पदाधिकाऱ्यांनीही शिवसेना ठाकरे गटासोबतच्या युतीबाबत प्रश्न विचारले. बहुसंख्य पदाधिकाऱ्यांचा कौल पाहता ठाकरेंनीही पदाधिकाऱ्यांना नाराज न करता, 'युतीबाबतचा निर्णय माझ्यावर सोडा, तुमच्या मनासारखे करण्याचा प्रयत्न करू. परंतु, त्यासाठी थोडंसं 'वेट अँड वॉच' करा,' असा सबुरीचा सल्ला देत, युतीबाबतचे दार अप्रत्यक्षपणे खुले ठेवले आहे.

## धाराशिव - कळंब मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री प्रतापजी सरनाईक यांच्या सोबत सविस्तर चर्चा



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१६, धाराशिव :** कळंब विधानसभा मतदार संघातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. प्रतापराव सरनाईक यांच्यासमवेत धाराशिवचे शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी सविस्तर चर्चा केली. निवडणुकांमध्ये सर्वाधिक स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकविण्यासाठी जोमाने कामाला लागून शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे हात बळकट करा असे आवाहन यावेळी पालकमंत्री ना. सरनाईक यांनी केले.मुंबई येथे मंत्री ना. सरनाईक यांच्या कार्यालयात झालेल्या या चर्चेत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासोबत शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक मोठ्या ताकदीने लढविण्याचा निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी व्यक्त केला. शिवसेना पक्षप्रमुख पदाची सूत्रे एकनाथजी शिंदे यांनी हाती घेतल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पहिल्यांदाच होत आहेत. त्यासाठी सर्व निष्ठावंत शिवसैनिक मोठ्या जोमाने कामाला लागले आहेत. शहरापासून गाव खेड्यांपर्यंत विविध विकासकामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यामुळे जनतेच्या मूलभूत सुविधा आणि विविध विकासकामांना गती आली आहे. त्यामुळे ही निवडणूक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

निष्ठावंत उमेदवारांना संधी देऊन या निवडणुकीत सेनेचा भगवा फडकविण्याचे आवाहनही पालकमंत्री ना. सरनाईक यांनी केले. त्याचबरोबर धाराशिव शहरातील विविध विकासकांसाठी निधीबाबत देखील यावेळी चर्चा करण्यात आली.

## उद्या नवी मुंबईला पाणी नाही...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणारी १७०० मि.मी. व्यासाची पामबीच मार्गालगत असलेल्या मोरबे मुख्य जलवाहिनीवर नेरुळ सेक्टर-४६, अक्षर बिल्डींग जवळ वारंवार गळती होत आहे.

त्यामुळे या ठिकाणी नवीन जलवाहिनी टाकण्यात आलेली असून, नवीन जलवाहिनी जुन्या जलवाहिनीला दोन्ही बाजूस जोडणीचे काम शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५ रोजी हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासून शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी पहाटे ०४.०० वाजेपर्यंत १८ तासांकरीता मुख्य जलवाहिनीवरील पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली या विभागामध्ये तसेच नमुंमपा क्षेत्रातील मुख्य जलवाहिनीवरील थेट नळ जोडण्यांचा व सिडको क्षेत्रातील खारघर व कामोठे नोड मधील पाणी पुरवठा बंद राहील. शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी संध्याकाळचा व शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी सकाळचा पाणी पुरवठा होणार नाही, तसेच शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी कमी दाबाने व अपुरा पाणी पुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावयाची आहे.

तरी या कालावधीत पाण्याचा जपून वापर करुन सहकार्य करावे असे आवाहन नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील नागरिकांना करण्यात येत आहे.




## शुभांशूने रचला इतिहास

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील (आयएसएस ) १८ दिवसांच्या वास्तवानंतर आणि २२.५ तासांच्या प्रवासानंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ऑक्सिऑम ४ मोहिमेतील आपल्या तीन सहकाऱ्यांसह मंगळवारी पृथ्वीवर सुरक्षित परतले आणि इतिहास घडला. शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतताच त्याच्या कुटुंबासह संपूर्ण देशात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतण्याचा क्षण देशवासीयांसाठी अभिमानाचा क्षण होता. शुभांशू शुक्ला आपली मोहीम फत्ते करून पृथ्वीवर परत आले हा क्षण १४० कोटी भारतीयांनी आपल्या मनात साठवून ठेवला. शुभांशू शुक्ला सुरक्षित परत आल्याने १४४ कोटी भारतीयांना ' अंतराळ ठेंगणे झाले' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शुभांशू हे भारताचे दुसरेच अंतराळवीर आहेत. या आधी विंग कमांडर राकेश शर्मा यांनी ४१ वर्षापूर्वी अंतराळाला गवसणी घातली होती त्यानंतर आता तशी कामगिरी करणारा शुभांशू हा पहिलाच आणि देशातील केवळ दुसरा अंतराळवीर ठरला आहे.

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला २५ जून रोजी ऑक्सिऑम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले होते. शुभांशू शुक्ला हे या मोहिमेचे पायलट होते. भारतीय वेळेनुसार दुपारी २५ जून रोजी दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लाँच करण्यात आले होते . सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान २६ जून रोजी दुपारी ४.३० वाजता सुमारे २८.५ तासांनंतर आयएसएसशी जोडले गेले

अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली होती.

**मोहिमेचे उद्दिष्ट !**

ऑक्सिऑम ४ या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे होते. हे अभियान खाजगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणारे देखील होते आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक ( ऑक्सिऑम स्टेशन) बांधण्याची योजना असलेल्या ऑक्शन स्पेस प्लॅनिंगचा एक भाग होता.

**वैज्ञानिक प्रयोग :** सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात विविध प्रयोग करणे.

**तंत्रज्ञान चाचणी :** अवकाशात नवीन तंत्रज्ञानाची चाचणी आणि विकास.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य :** विविध देशांतील अंतराळवीरांना व्यासपीठ प्रदान करणे.

**शैक्षणिक उपक्रम :** अवकाशातून पृथ्वीवरील लोकांना प्रेरणा देणे आणि जागरूकता पसरवणे.

**शुभांशू शुक्ला कोण आहेत ?**

शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे झाला. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. अंतराळवीर होण्यासाठी त्यांनी रशिया आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेतले. यामध्ये त्यांनी सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, आपत्कालीन हाताळणी आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये काम करायला शिकले.

**शुभांशू शुक्ला यांनी आयएसएसवर काय केले ?**

शुभांशू १४ दिवस तिथे राहिले आणि त्यांनी ७ प्रयोग केले, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत. यापैकी बहुतेक जैविक अभ्यास आहेत, जसे की अंतराळातील मानवी आरोग्यावर आणि जीवांवर होणारा परिणाम पाहणे. याशिवाय, त्यांनी नासासोबत आणखी ५ प्रयोग केले, जे दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करणारे आहेत. या मोहिमेत केलेले प्रयोग भारताच्या गगनयान मोहिमेला बळकटी देणारे ठरतील. शुभांशूचा हा अनुभव २०२७ साली नियोजित असलेल्या गगनयान मोहिमेसाठी उपयुक्त ठरेल. त्यांनी आणलेला डेटा आणि अनुभव भारताच्या अंतराळ कार्यक्रमास पुढे नेण्यास मदत करू शकेल.

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रसर - अण्णाभाऊ

भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाटये या माध्यामातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिमाभागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी आपल्या 'लालबावटा' कलापथकातर्फे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची '१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना' होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है! इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन मध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठी भाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. या चळवळीत त्यांची अग्रसर भूमीका होती.

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करतांना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले. अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले असले तरी, त्यांचा मूळपिंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील, पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्क राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा



तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि-अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण-घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.

भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.

अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनी फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत.

मुंबई, पूणे आणि मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणी कामगार या दोन गाण्यांतून मुंबईला दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याचा मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही. भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषत: मांग जातीचे प्रतीक बनले आहेत. शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग-आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष- शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांमध्ये समर्थन मिळविण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे आणि आजही करीत असतात.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, ज्याला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ गैरभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्या व्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

१ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. पुण्यातील सेनापती बापट चौकानजीक रस्त्याला अण्णाभाऊ साठे मार्ग म्हणुन घोषित करण्यात आले. मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी, त्यांना आदराने व विनम्रपणे श्रद्धांजली अर्पण करणे, हा मराठी भाषिकांसाठी एक महत्त्वाचा दिवस असतो. त्यांच्या कार्याला व विचारांना स्मरून त्यांना आदराने अभिवादन करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**प्रविण बागडे**
**नागपूर**

# अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीवरील 'ते' कला केंद्र तातडीने बंद करा

## रविंद्र राजदेव यांचा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या पारनेर - जुन्नर तालुक्याच्या हद्दीतील नगर -कल्याण रस्त्यावरील पेमदरा गावात सुरू असलेल्या कलाकेंद्राचे काम तातडीने बंद करण्यात यावे अन्यथा निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र



राजदेव यांनी दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, नगर जिल्ह्याच्या हद्दीपासून जवळच सावरगाव परिसरात कला केंद्राचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मात्र जर ते कलाकेंद्र झाले तर आजूबाजूच्या नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्याबरोबरच अनेक लोकांचे संसार प्रपंच उद्धवस्त होऊन घरे बरबाद होणार आहे. तसेच ज्या भागात कलाकेंद्र आहे त्या भागातील शांतता देखील भंग होत आहे. तसेच तो परिसर गुन्हेगारांचा अड्डा बनत असतो. तसेच सद्यस्थितीत ज्या ठिकाणी कला केंद्र होतं आहे. त्या ठिकाणापासून तीन किलोमीटर अंतरावर श्री क्षेत्र रंगदास स्वामी देवस्थान, श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान, श्री क्षेत्र हनुमान देशस्थान सावरगाव, श्री क्षेत्र हरेश्वर देवस्थान कर्जुले हर्या व ढोकेश्वर देवस्थान अशी धार्मिक देवस्थाने आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या गावात शाळा, कॉलेज देखील आहे. तसेच युवकांच आयुष्य देखील उद्धव होऊ शकते. त्यामुळे सर्व परिस्थिती बघता पेमदरा गावात सुरू असलेले कलाकेंद्र तातडीने बंद करण्यात यावे अन्यथा रास्ता रोको करण्यात असे निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

## बोरीत उद्यानदुतांकडून माती व पाणी परीक्षण

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१६, खंडाळा (सातारा) :** बोरी (ता. खंडाळा) येथे फलटण येथील श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय अंतर्गत ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत माती व पाणी परीक्षण हा कार्यक्रम फलटणच्या उद्यान दूत माने आकाश,भोईटे रविराज, रानभरे पार्थ, अभंग सनी,बर्गे रुपेश यांनी आयोजित केला होता. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना माती व



पाणी परिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे अन्नद्रव्ये व पिकातील अन्नद्रव्यांचा अभाव टाळण्यासाठी केले जाणारे उपाय ही माहिती या कार्यक्रमा मार्फत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरले. तसेच गावातील शेतकऱ्यांना माती परीक्षण म्हणजे काय? माती व पाणी परिक्षणाचे फायदे,जमीन पोत सुधारणा करण्यासाठी घ्यावयाची उपाय योजना, या सर्व विषयांवर कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा.डॉ. प्राजक्ता मेटकरी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे माजी सरपंच अँड सचिन धायगुडे, भगवान दादा शेडगे, सुरेश बापू जावळे, बापुराव धायगुडे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश जावळे, वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका उपाध्यक्ष स्वप्निल जावळे, सर्व ग्रामपंचायत सदस्य व बहुसंख्येने शेतकरी वर्ग उपस्थीत होता. या कार्यक्रमासाठी श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. निंबाळकर, कृषी नेतृत्वाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी. चव्हाण, कार्यक्रम अधिकारी , प्रा. डॉ. व्ही. लेंभे, प्रा.डॉ.ए.के. अभंगराव व समन्वयक प्रा.ए.डी. पाटील, माती व पाणी परीक्षण तज्ञ डॉ.प्राजक्ता मेटकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (परसेवा) यांचे समोर
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई
नोंदणी क्र. बी.ओ.एम./बी. डी. आर. (२)/जी. एन. एल. (ओ)/१०२/२००१-२००२/२२-३-२००२

कार्यालय पत्ता : ६/६०३, दुर्गा कृपा को-ऑप. हौ. सोसा. लि., हनुमान चौक, नवघर रोड, मुलुंड (पु), मुंबई - ४०००८१

जा.क्र. १०८५९ ते १०८६३/२०२५ दिनांक ०४/०७/२०२५

*** जाहीर नोटीस ***

**( महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ अन्वये सुनावणी नोटीस )**

**अर्जदार :** नवयुग विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, कार्यालय, ६, चंद्रनगर, बी विंग, तळमजला, दम्माणी ईस्टेट, नौपाडा, ठाणे (प) ४००६०२
**अनुक्रमांक :** १ ते ५

| अ.क्र. | दावा क्रमांक | थकबाकीदार कर्जदाराचे नांव व पत्ता | जामिनदारांचे नांव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | १९६०/२०२५ | श्री. साहेबराव विठ्ठल पार्टे<br>श्री. सुनिल साहेबराव पार्टे (सह कर्जदार )<br>श्री. अनिल साहेबवराव पार्टे (सह कर्जदार)<br>रा. रुमं. ८७४, एस.एस.-३, सेक्टर- १७,<br>श्री दत्तकृपा ओनर्स असोसिएशन,<br>कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९ | १) श्री. राजाराम आप्पाजी पाटणे रा. रा. आनंद विहार बी.नं. १२, फ्लॅट नं. ३०६, खारेगाव, रेल्वे कॉलणी-क्रॉस गेट, कळवा, ठाणे (प) ४००६०५<br>२) श्री. दत्तात्रय दगडू शेलार रा. रा. सी-३०२, कनाकिया आर्वा, दत्तपाडा रोड, बोरीवली (पु.) मुंबई-४०००६६ | ११९२२१५/- |
| २) | १९६१/२०२५ | श्री. विश्वनाथ नारायण परब<br>श्री. तुषार विश्वनाथ परब (सह कर्जदार )<br>श्री. विनोद विश्वनाथ परब (सह कर्जदार )<br>रा. रुम नं. ०३, जय संतोषी माता चाळ नं. १,<br>महेश्वरी नगर, आप्पा पाडा, कुरार व्हिलेज,<br>मालाड (पुर्व), मुंबई- ४०००९७ | १) श्री. रतिश मंगेश बागवे<br>रा. रुम नं. ०२, जय संतोषी माता चाळ नं. १.<br>महेश्वरी नगर, आप्पा पाडा, कुरार व्हिलेज,<br>मालाड (पुर्व), मुंबई-४०००९७<br>२) श्री. रोशन रामचंद्र पाटील रा. रुम नं. ०१<br>श्रीराम निवास, आर. बी. कदम मार्ग,<br>कर्वे नगर, घाटकोपर (प.), मुंबई ४०००८४ | ५४७५५८/- |
| ३) | १९६२/२०२५ | श्री. शैलेश गणपत पार्टे<br>रा. एस. एस. २, रुम नं. ६३१,<br>सेक्टर १५, कोपरखैरणे,<br>नवी मुंबई-४००७०९ | १) श्री. धनाजी तानाजी अखाडे<br>रा. एस. एस. ३, रुम नं. ४१०, १५,<br>कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९<br>२) श्री. हरिष बाबु फडके<br>रा. राम कृपा अपार्टमेंट, प्लॉट नं. ३०४,<br>रुम नं. १, सेक्टर १९,<br>कोपरखैरणे, नवी मुंबई- ४००७०९ | ४८०६१/- |
| ४) | १९६३/२०२५ | श्री. शरद सखाराम हुमणे<br>रा. १०१, महावीर चाळ नं. ३१४,<br>गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल,<br>डिलाईल रोड, मुंबई ४०००१३ | १) श्री. आकाश गेणु सपकाळ<br>रा. जय भवानी मार्केट, गाळा नं. १५,<br>सेक्टर १०, नेरुळ, नवी मुंबई -४००७०६<br>२) सौ. सीमा प्रशांत अंबावले<br>रा. ८४७, तिसरा मजला प्लॉट नं. ८९,<br>सी.जी.एस. क्वार्टर्स, रावजी गणत्र<br>रोड, से.१, कने नगर, ॲन्टॉप हिल,<br>मुंबई-४०००३७ | २९४९९५/- |
| ५) | १९६५/२०२५ | श्री. संतोष अंकुश पेडणेकर<br>रा. रुम नं. ०३ मिना देसाई चाळ, तानाजी वाडी,<br>पाईप लाईन च्यावरती, टी. पी. रोड, टेंबी पाडा,<br>भांडुप (प.), मुंबई ४०००७८ | १) श्री. अमित प्रभाकर तवसाळकर<br>रा. ४/६८, हनुमान प्रसाद बिल्डींग, बी. जे. मार्ग, सुंदर गल्ली समोर,<br>भायखळा (प.), ४०००११<br>२) श्री. रुपेश गंगाधर आंगणे<br>रा. रुम नं. ०२, सरजु मौर्या चाळ नं. ०२,<br>साई विहार, टी. पी. रोड, भांडुप (प.),<br>मुंबई-४०००७८ | १३२१५३/- |

याअर्थी उपरोक्त अर्जदार संस्थेने दिनांक २८/०३/२०२५ रोजी या कार्यालयात वसुली दाखला मिळणेसाठी अर्ज केला असून सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील उपरोक्त प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजु न झाल्यानेव त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत. वरनमुद अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २५/०७/२०२५ रोजी दुपारी ०२.०० या वेळेत दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसद्वारे वरील प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याप्रमाणे वरील तारखेस तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

( सही )
(बी.के. येल्हारे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई

**ठिकाण :** मुलुंड, मुंबई
**दिनांक :** ०४/०७/२०२५

शिक्का

# संगीत साधनेतून सुसंस्कारांची जोपासना

## कांबा जिल्हा परिषद शाळेतील उपक्रम चर्चेत



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१६, कांबा (कल्याण) :** सध्याच्या काळात जिल्हा परिषद शाळांची परिस्थिती ढासळलेली असताना, अनेक शाळा बंद होण्याच्या मार्गावर असताना, कांबा येथील जिल्हा परिषद शाळा मात्र एक वेगळाच आदर्श निर्माण करत आहे. या शाळेतील शिक्षक राजाराम वामन वेखंडे यांच्या अनोख्या व नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे ही शाळा आता चर्चेचा विषय ठरली आहे. या शाळेत दररोज सकाळी होणारा संगीतमय शालेय परिपाठ हा उपक्रम विशेष लक्ष वेधून घेत आहे. परिपाठ म्हणजे केवळ नियमपालन नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. याच हेतूने, गांधीजींच्या प्रार्थनेच्या परंपरेचा आदर्श ठेवत शाळेने प्रार्थनेला संगीतमय रूप दिले आहे.

परिपाठाची सुरुवात हार्मोनिअम, ढोलकी व खंजिरीच्या तालावर होते. शिक्षक राजाराम वेखंडे स्वतः हार्मोनिअम वाजवतात, तर विद्यार्थी गौरव पावशे तालबद्धपणे ढोलकी वाजवतो. संपूर्ण वातावरण मंत्रमुग्ध करणारे असते. प्रार्थना, सुभाषिते, घोषवाक्य, श्लोक हे सर्व वाद्यांच्या साथीने सादर होतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे शाळेतील आगमन वेळेवर होत असून आनंदाने ते शाळेतील दैनंदिन उपक्रमात सहभागी होतात. दिवसभर अध्ययनासाठी त्यांची मानसिक तयारी सुद्धा उत्तम राहते. शाळेतील प्रसन्न व आनंदी वातावरण पाहून पालकांचाही सहभाग वाढत आहे. पालक मंडळी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत असून, इतर शाळांनीही या उपक्रमातून प्रेरणा घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. संगीत हा आत्म्याचा आवाज आहे, असे म्हणतात. कांबा शाळेने याचे वास्तवात रूपांतर करून विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार रुजविण्याचे कार्य सुरू केले आहे.

# पर्यटन मंत्र्यांच्या तालुक्यातील गड, किल्ले शासनाच्या नजरेतून दुर्लक्षित...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा)** : जागतिक वारसा स्थळे म्हणून युनोस्कोच्या यादीत वर्ल्ड हेरिटेज मधे महाराष्ट्रातील रायगड, राजगड, पन्हाळगड, प्रतापगड, शिवनेरी, लोहगड, सिंधुदुर्ग, साल्हेर, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच तामिळनाडू येथील स्वराज्याची तिसरी राजधानी राहिलेला जिंजी या १२ किल्यांचा समावेश झाला. हा महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून अभिमानास्पद गौरवशाली बाब आहे. महाराष्ट्र शासनाने या किल्यांबरोबर राज्यातील इतर लहान-मोठ्या किल्ल्याकडे संवर्धन व पर्यटन दृष्टीने लक्ष द्यावे ही मागणी होत असताना राज्याचे पर्यटन मंत्री असणाऱ्या शंभुराज देसाई यांच्या पाटण तालुक्यातील दुर्गम ऐतिहासिक असणाऱ्या सुंदरगड, भैरवगड, जंगली जयगड, गुणवंतगड या किल्ल्याकडे पर्यटन विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे जाणवत असल्याची भावना पाटण तालुक्यातील शिवप्रेमीच्यांतून बोलली जात आहे.

पाटण तालुका सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यात दऱ्याखोऱ्यात वसलेला आहे. या तालुक्याला छत्रपती शिवकालीन ऐतिहासिक महत्त्व आहे. येथे निसर्ग सौंदर्याच्या सान्निध्यात सह्याद्रीच्या माथ्यावर छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेले भैरवगड, सुंदरगड, जंगली जयगड, गुणवंत गड हे किल्ले आपल्या पूर्वजांचा इतिहास जपत आजही ताठ मानेने उभे आहेत. या किल्ल्यांची जपणूक शिवप्रेमी संवर्धन मावळ्यांनी हातात घेतली आहे. हे मावळे वेळोवेळी या किल्ल्यावर येवून स्वच्छता निघा राखत आहेत. अगदी शिवजयंती पासून ते मराठी परंपरेचे दिवाळी, दसरा सर्व सणवार किल्यावर साजरे करत आहेत.

शिवप्रेमी मावळ्यांनी या किल्ल्यांवर संवर्धनाचे राखलेले सातत्य त्यामुळे दिवसेंदिवस पर्यटकांची वर्दळ किल्ल्यांवर वाढली आहे. शिवप्रेमी पर्यटकांच्या दृष्टीने हे किल्ले प्रेक्षणीय स्थळे ठरत आहेत. मात्र महाराष्ट्र शासन वनविभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सुंदरगड (दातेगड), भैरवगड, जंगली जयगड या किल्ल्यांवर शासनाच्या वतीने पर्यटन वाढीसाठी अद्याप कोणतेही प्रयत्न झालेले नाहीत. ही शोकांतिका असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत.

मंत्री शंभुराज देसाई हे पाटण तालुक्याचे सुपूत्र आहेत त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन खात्याची जबाबदारी व सातारा जिल्हाचे पालकमंत्री पद आहे. शासनाच्या नजरेतून दुर्लक्षित राहिलेल्या या किल्ल्यांकडे मंत्री शंभुराज देसाई यांच्या पर्यटन विभागाचे लक्ष जाणार का..? याची प्रतिक्षा शिवप्रेमी मावळ्यांना लागली आहे.

भैरवगड व जंगली जयगड सह्याद्रीच्या कोकण घाटमाथ्यावर आहेत. या किल्ल्यांवर प्राचीन मंदिरे, पाण्याची टाके, बुरुज, दगडी तटबंदी असे ऐतिहासिक अवशेष पाहायला मिळतात.

या किल्ल्यावरून कोकणचे विलोभनीय दृश्य नजरेस येते. तर सुंदरगड येथे वैशिष्ट्यपूर्ण काळ्या कातळात कोरलेला मुख्य खंजीर दरवाजा, दरवाजातील गणपती, हनुमान शिल्प, सर्वात आकर्षण येथील तलवार विहीर व विहीरीतील महादेव मंदिर, पाण्याचे टाके, कोसळलेल्या अवस्थेत बुरुज, दगडी तटबंदी वाडे, राहोट्या यांचे अवशेष पाहायला मिळतात. या तिन्ही किल्ल्यांवर जाण्यासाठी मार्ग, दगडी पायऱ्यांची दुरुस्ती पाण्याचे टाके, विहीरी यांना संरक्षण कठडे, माहिती फलक या प्राथमिक दुरुस्ती आवश्यक आहेत. याकडे महाराष्ट्र शासन पर्यटन विभागाचे लक्ष जाणे आवश्यक आहे.




पाटणच्या दऱ्याखोऱ्यातील सह्याद्रीला मोठी ऐतिहासिक व नैसर्गिक सृष्टीची देणगी लाभली आहे. शिवकार्याचे जतन व संवर्धन होण्यासाठी आम्ही गेले २० वर्ष गड संवर्धनाचे कार्य करतो. सुंदरगड (दातेगड) आणि भैरवगडावरील छत्रपतींचा इतिहास जोपासण्याचे आम्ही नेहमी प्रयत्न करतो. या गडांच्या विकासात्मक वाटचाल व पर्यटन वाढीसाठी स्थानिक ग्रामस्थांना बरोबर घेऊन गेल्या १५ वर्षांत अनेकवेळा शासनाला प्रस्ताव सादर केले आहेत. या प्रस्तावाची एक प्रत मंत्री शंभुराज देसाई यांना अर्थखात्याचे राज्यमंत्री असतानाच सादर केली आहे. सद्या ते पर्यटन खात्याचे कॅबिनेट मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. तालुक्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांकडे त्यांचे लक्ष जाईल अशी धारणा शिवप्रेमी मावळ्यांची आहे.

**- लक्ष्मण चव्हाण (गड संवर्धक)**

# दिव्यात उघड्यावर दारू पिणाऱ्या तळीरामांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी - शैलेश पाटील

## नगरसेवक शैलेश पाटील (शिंदे गट, दिवा शहर) यांनी मुंब्रा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना दिले निवेदन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील गजबजलेला परिसर असलेल्या दिवा सर्कल चौक परिसरातील दारू दुकानांसमोर पोलिस प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष दिसून येत असून उघड्यावर दारू पिणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसून येत असून याचा नाहक त्रास पादचारी महिला, लहान मुले तसेच जेष्ठ नागरिकांना होत असल्याच्या तक्रारी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या कार्यालयात येऊ लागल्याने शैलेश पाटील यांनी तात्काळ मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांना नुकतेच निवेदन दिले आहे.

सदर उघड्यावर दारू पिणाऱ्या तळीरामांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. राज्यात अनेक ठिकाणी दारू विक्रीची दुकाने आहेत. मात्र दिवा परिसरातील दुकानांभोवती दिसणारा बिनधास्त दारू सेवनाचा धुमाकूळ दिसून येत असून अश्लीलतेचा इतरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सदर दारू दुकानदार दारू विक्रीबरोबरच सोडा, पाणी, चणे, फुटाणे, फरसाण यांसारख्या 'पूरक' वस्तू विकून रस्त्यावरच




दारू प्यायची 'सोय' दुकानदार करून देत असल्याने याचा अर्थ असा की हे दुकानदार रस्त्यावरील दारू सेवनाला थेट प्रोत्साहन देत असल्याचे उघड होत आहे. हे सर्व प्रकार उच्चभ्रू सोसायट्यांच्या प्रवेशद्वाराजवळ सुरू असून, तेथे राहणाऱ्या महिलांवर विकृत टोळक्यांचे वागणे, शरीरविक्षेप, अश्लील इशारे, अंगचटीचा प्रयत्न या सर्व प्रकारामुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यावरचपोलीस प्रशासनाला जाग येणार का? असा थेट सवालचनगरसेवक शैलेश पाटील यांनी उपस्थित केला आहे. पोलिसांनी ही समस्या तक्रारी मिळाल्यावर न पाहता स्वतःहून तातडीने लक्ष घालणे अपेक्षित आहे.

अन्यथा या कृत्यांना पोलीस खात्याचा मूक पाठिबा असल्याचे समजावे लागेल असे शैलेश पाटील यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. सदर दिवा चौका जवळील रस्त्यावर दारू पिणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, दारू दुकानदारांकडून 'पूरक साहित्य' विक्रीवर बंदी आणावी. परिसरातील महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त नियमित असावा, दारू दुकानदारांना दुकानाबाहेर काय घडते याची जबाबदारी झटकता येणार नाही. दारू दुकनादार ही या समाजाचेच घटक आहेत. त्यामूळे केवळ पैसा कमावणे एवढ्याच उद्देशाने समोर सुरू असलेला नंगानाच दुर्लक्षीता येणार नाही. त्यांनी हे तात्काळ थांबवण्यासाठी स्वतः हून उपाययोजना करणे अपेक्षीत आहे. सदर प्रकार तात्काळ थांबवले गेले नाहीत तर तीव्र स्वरूपाच्या आंदोलन करू व यास कारणीभूत पोलीस प्रशासन असेल असे माझी नगरसेवक शैलेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. दिवा चौक हे दिव्याचे प्रवेशद्वार असून दिवा शहराबद्दल चूकीचा संदेश समाजात जावू नये. असा इशाराच शैलेश पाटील यांनी मुंब्रा पोलिसांना दिलेल्या निवेदनातून लेखी स्वरूपात कळविले आहे.

# ऑपेरेशन सिंदूर लोकमान्य टिळक विद्यामंदिर व ज्यू कॉलेज चिखलगाव येथे सादर

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.१६, दापोली (रत्नागिरी) :** आज लोकमान्य टिळक विद्यामंदिर व ज्यू कॉलेज चिखलगाव येथे नुकत्याच झालेल्या ऑपेरेशन सिंदूर या संपूर्ण ऑपेरेशनची माहिती देण्यासाठी लेफ्ट कर्नल सर्वांनन आणि मेजर मैत्रयी दांडेकर (निवृत्त) हे दोघे आले होते. इ.८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थीसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. लेफ्ट कर्नल सर्वांनन हे इन्फ्रन्ट्रीमध्ये गेली १५ वर्ष कार्यरत आहेत. तसेच ऑपेरेशन सिंदूरमध्ये त्यांना आर्मी इंटेलिजन्टची जवाबदारी होती. पेहेलगाम हल्यापासून ते पाकिस्तान कडून युद्ध बंदीची घोषणा होईपर्यंत घडलेल्या घटना भारताची राजकीय रानणिती तसेच तिन्ही सेनादालांचे काम यावर सखोल माहिती मुलांना देण्यात आली. अतिशय सोप्या भाषेत लेफ्ट कर्नल सर्वांनन यांनी हे मुलांना समजावून दिले. विविध फोटो, युद्धानीती, भारताची तयारी, आर्मी ची जवाबदारी तसेच आता पुढील रानाणिती यावर ही चर्चा झाली. तसेच मुलांच्या प्रश्नांना ही अतिशय मार्मिक उत्तर मिळाली. अतिशय उत्तहाच्या वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी लोकमान्य टिळक विद्यामंदिर चिखलगावचे संस्थापक राजा दांडेकर. शाळेचे मुख्याध्यापक श्री.ढेरे, शिक्षिका धनश्री दांडेकर सर्व शिक्षक वृंद वसतिगृहाचे रेक्टर, दाभोळकर उपस्थित होते.

# मद्याचे भाव वाढल्याने मध्यमवर्गीय मद्यप्रेमींना धक्का

## 'लाडकी बहिण' योजनेचा भार आता 'भाऊजी'च्या खिशावर



**सरकारच्या धोरणावर सवाल**

राज्य सरकारने महागडे विदेशी मद्य दरवाढीपासून वाचवले, मात्र मध्यमवर्गीयांचे आवडते ब्रँड मात्र महाग केले गेले आहेत. या दरवाढीकडे ऋलाडकी बहिण' योजनेच्या निधीसाठी भाऊजींकडून वसूली सुरू आहे. म्हणून मद्यप्रेमी नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

**दारू दुकान चालकांचे मत**

आम्ही नियमित परवाना फी भरतो. पण आता दरवाढीमुळे ग्राहक रागावतात,वाद होतात शिस्तीत व्यवसाय करणे अशक्य झाले आहे. मद्य दरवाढीचा फटका फक्त ग्राहकांनाच नव्हे तर वाईन शॉप व बियर बार चालकांनाही बसत आहे. सरकारला निधी उभारणीसाठी वेळी व्यवस्था करावी लागेल अन्यथा या निर्णयाचे सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम दूरगामी ठरू शकत आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** राज्यात लाडकी बहिण योजनेसाठी निधी उभारणीसाठी सरकारने मद्य दरात केलेली वाढ सध्या वादाचा विषय ठरत आहे. विशेषतः मध्यमवर्गीय ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्या मद्य प्रकारांवर म ोठ्या प्रमाणात दरवाढ झाल्याने मद्यप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात सर्वाधिक मागणी असणारे काही म द्यप्रकार सध्या बाजारातून गायब झाले असून, परिणामी राज्यातील सर्व अनेक वाईन शॉप चालकांनी आपले दुकान बंद करून दरवाढीच्या विरोधात बंद पाळण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने देशी दारूच्या् १८० मिलीच्या कॉटर मागे १० रुपयाची वाढ केल्याने ६० रुपयांस मिळणारी क्वाटर ८० रुपये दराने खरेदी करावी लागत असल्याने मद्य प्रेमींमध्ये निराशेचे सूर उमटत आहे.

महाराष्ट्र शासनाने एक जूनपासून एक्साईज ड्युटी व व्हॅटमध्ये १६ टक्क्यांची भाववाढ केल्याने कन्ट्री लिकर उत्पादनात १८९ मिली लिटरच्या बॉक्सम ागे प्रती कॉटर दहा रुपये ९० मिली मागे पाच तर ७५० च्या खंब्यामागे ४० रुपये भाववाढ केल्याने मद्यपान करणार्यामधून निराशेचे सूर उमटत आहे.

एमआरपी दरापेक्षा कॉटरमागे १० तर ९० मिलीस ५ रुपये ज्यादा सीएल ३ लायसन्स धारक उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकार्यांना हाताशी धरून वसुल करत असल्याने या विरोधात जिल्ह्यातील दारुबंदी अशासकीय सदस्यांनी उत्पादन शुल्क उपायुक्त पुणे यांच्याकडे लेखी तक्रार करत कारवाईची मागणी केली आहे.

देशी मद्य दरात अचानक झालेल्या भाववाढीमुळे अनेक मद्यपींनी नवसागर पासून तयार होणार्या गावठी दारुकडे म ोर्चा वळवला असल्याने विषारी दारुकांड घडल्यास यास जबाबदार कोण असेल? याची कल्पना न केलेली बरी.

महाराष्ट्र शासन उत्पादन शुल्क खात्याने मंत्रालय स्तरावर राज्यातून दाखल होणार्या तक्रारी सदर्भात स्थापन केलेल्या कक्षात तक्रार दाखल केल्यास ज्या अधिकार्यांच्या विरोधात तक्रार आहे त्यांच्याकडेच तपास सोपवला जात असल्याचा अनुभव अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना येत आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायत शाळांतील शिक्षक-कर्मचारी पेन्शन योजनेपासून वंचित

## आ.अडबाले यांचा विधानपरिषदेत लक्षवेधीद्वारे सवाल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषदेत नगरपरिषद व नगरपंचायतीतील शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या पेन्शन विषयक प्रश्नांवर आमदार सुधाकर अडबाले यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे शासनाकडे मागणी केली. दरम्यान, मंत्री उदय सावंत यांनी उत्तरात एक ते दीड महिन्यात ही फाईल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री (अर्थमंत्री) यांच्याकडे यादर केली जाईल आणि त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना (डीसीपीएस) लागू करण्यात आली. राज्यातील महानगरपालिकेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देखील नगरविकास शासन निर्णय २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू करण्यात आली आहे. मात्र, नगरपरिषद व



नगरपंचायत शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना अद्याप कोणतीही पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही, असा मुद्दा आ. सुधाकर अडबाले यांनी सभागृहात उरस्थित केला. ते पुढे म्हणाले, ' सदर योजना ही अंशदानावर आधारित असून कर्मचाऱ्यांचा हिस्सा व शासनाचा हिस्सा यावर पेंशन मिळते. परंतू आज २० वर्षे झाली तरीही या कर्मचाऱ्यांना कोणतीही पेंशन योजना लागू करण्यात आलेली नाही. दरम्यान, काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले, काहींचे निधन झाले, तरी त्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. मागील अधिवेशनात देखील याबाबत शासन विचाराधीन असल्याचे उत्तर देण्यात आले होते आणि या वेळेसही तसेच उत्तर दिले गेले. हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत स्पष्ट निर्णय जाहीर करणार का? असा थेट सवाल आ. अडबाले यांनी सरकारला केला.

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत म्हणाले, नोव्हेंबर २००५ पासून लागू करण्यात आलेल्या अंशदान निवृत्ती वेतन योजनेला केंद्र शासनाच्या नवीन निवृत्ती वेतन योजना ( एनपीएस) मध्ये २०१५ पासून संलग्न करण्यात आली आहे. यासंदर्भात वित्त विभागाने संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. ही फाईल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री (अर्थमंत्री) यांच्याकडे सादर केली जाईल आणि त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

# शासनाने बांधलेली सार्वजनिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका खुली करा - सचिन कांबळे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** लोकनेते बाळासाहेब देसाई भवन पंचायत समिती पाटण इमारतीमधील शासनाने बांधलेली सार्वजनिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका गेली काही वर्षं कुलूप लावून यामध्ये इतर साहित्य ठेवण्यात आले आहे. लोकनेते बाळासाहेब देसाई भवन पंचायत समिती पाटण इमारतीमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासीका कुलुप लावून बंद करण्यात आली आहे.

त्यामुळें पाटण तालुक्यातील काही युवक, युवती महिला पुरुष लोकांकडून अनेक वेळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळींचे पाटण तालुका नेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती पाटण तालुका अध्यक्ष तथा रिपब्लिकन सेना पाटण तालुका अध्यक्ष सचिन कांबळे यांच्याकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका लावलेले कुलूप उघडून अभ्यासिका खुली करण्यात यावी म्हणून तालुक्यांतील लोकांची मागणी होत असल्याने रिपब्लिकन सेना पाटण तालुका यांनी गटविकास अधिकारी, पाटण यांना लेखी निवेदन मागणी करून या इमारतीमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका कुलूप लाऊन व इतर साहित्य ठेवण्यात येऊन बंद ठेवण्यात आली आहे तरी रिपब्लिकन सेना पाटण तालुका अध्यक्ष सचिन कांबळे यांनी केलेल्या लेखी निवेदन मागणीनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका तातडीने उघडण्यात यावे. तसेच तालुक्यांतील सर्वांना अभ्यसिका खुली करून देण्यात यावी व या अभ्यासिकामध्ये जे काही साहित्य ठेवण्यात आले आहे. ते साहित्य इतर ठिकाणी तातडीने



हलवण्यात यावे व लोकनेते बाळासाहेब देसाई भवन पंचायत समिती पाटण इमारतीमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका तातडीने शासकीय वेळेनुसार खुली करण्यात यावी. यावेळी रिपब्लिकन सेना पाटण तालुका अध्यक्ष सचिन कांबळे यांचेसह रिपब्लिकन सेना पदाधिकारी उपस्थित होते.

# अखेर श्रमजीवीच्या आंदोलनाला यश - बाल वेठबिगारांना मिळाले मुक्ततेचे अधिकृत दाखले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, आष्टी (बीड) :** वेठबिगार मुक्तीचा अधिकार, प्रशासन का करतं इनकार? अशा जोरदार घोषणांनी आज आष्टी तहसील कार्यालय परिसर दणाणून गेला. श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली झालेल्या ठिय्या आंदोलनाला यश लाभले असून सेवालाल गहूखेल तांडा येथील बाल वेठबिगारांना अखेर मुक्ततेचे दाखले मिळाले. श्रमजीवी संघटनेच्या वतीने, मुक्त झालेल्या आदिवासी वेठबिगारांच्या मुलांना अधिकृत वेठबिगार मुक्ती दाखले मिळावेत. यासाठी तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. मात्र, तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आदेश हवा, असे कारण देत दाखले देण्यास सुरुवातीला नकार दिला. याचवेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख यांनी मुक्तीचे दाखले देण्याचा अधिकार माझा आहे, असे स्पष्ट करत प्रशासनातील गोंधळ उघड केला. परंतु तरीही कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व मुक्त वेठबिगार यांनी कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले.

या आंदोलनात श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष, (मंत्री दर्जा) विवेक भाऊ पंडित यांनी स्वत: हस्तक्षेप करून प्रांत अधिकाऱ्यांना वेठबिगार मुक्ती कायद्यातील तरतुदी स्पष्ट केल्या. राज्यभरात याआधी दिलेले दाखले याचे पुरावे समोर ठेवले. ४ तास चाललेल्या या ठिय्या आंदोलनामुळे अखेर प्रशासन नमले. उपविभागीय अधिकारी श्रीमती शेख यांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना दाखले देण्यासाठी अधिकृत आदेश दिला. त्यानंतर मुक्त वेठबिगारांना अधिकृत दाखले देण्यात आले आणि आंदोलन आनंदात मागे घेण्यात आले. या




यशस्वी आंदोलनात श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस बाळाराम भोईर, ॲड. प्रभोधन निकाळजे, राजेश चन्ने, दशरथ भालके, रुपेश डोळे, संजय शिंदे, स्वप्निल वाघ, रमेश वाघमारे, सुनील वाघ, रतिलाल मेढा, गोकुल हिलम आदी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. आंदोलनकर्त्यांनी संघटनेची गीते गाऊन आणि जोरदार घोषणाबाजी करून प्रशासनाला जागे केले. शेवटी कायदा, संघर्ष आणि जाणीव यांच्या बळावर बाल वेठबिगारांना न्याय मिळाला आणि त्यांचा आत्मसन्मान अधिकृतपणे सन्मानित झाला. त्यामुळे श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# थोडक्यात

## सार्ड संस्था चंद्रपूर तर्फे खुटाळा येथे वृक्षारोपण संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.१६, चंद्रपूर :** 'सार्ड' संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.प्रकाश कामडे यांचे स्मृतिदिन निमित्य पोलीस कॉलनी, खुटाळा ता.जि.चंद्रपूर येथे वृक्षारोपण करण्यात आले. वनमहोत्सवाच्या निमित्ताने शेकडो वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये कडुलिंब, गुलमोहर, करंजी, आंबा, जांभूळ, बेल, करवंत, वड, कांचन, आवळा इत्यादी प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. शासन व वनविभागाच्या वतीने वन महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावेळेस 'एक पेड मॉ के नाम' अंतर्गत ठिकठिकाणी मोकळ्या जागेत विविध वृक्षांची लागवड केली जात आहे. या अनुषंगाने पोलील कॉलनी खुटाळा परिसरामध्ये विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष भाविक येरगुडे, कृष्णाजी नागपुरे अध्यक्ष भोई समाज, लटारी तुरानकर अध्यक्ष गुरुदेव सेवा मंडळ, ॲड.विलास माथनकर, इंजि.रवी पचारे, नितीन डोंगरे, इंजि. सुवर्णा कामडे, डॉ.राजू पिदूरकर, डॉ.नूतन पिदूरकर, नकुल कामडे, मुख्याध्यापिका जुनघरे, कृष्णदास माथनकर, श्यामराव बावणे, गुलाबराव बोबाटे, अर्चना माथनकर, नम्रता डोंगरे, कांबळे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकारिता भाविक येरगुडे, विलास माथनकर, नितीन डोंगरे, नकुल कामडे यांनी परिश्रम घेतले.

## वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील मुलांना मदतीचा हात

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१५, नवी मुंबई :** नेरुळ येथील यूथकौन्सिल या सेवाभावी संस्थेच्या विद्यमाने दिनांक १५ जुलै २०२५ रोजी पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमातील मुलांसाठी शालेय साहित्य, साबण, टूथपेस्ट, खोबरेल तेल, हात रुमाल अशा दैनंदिन लागणाऱ्या गरजेच्या वस्तू यांची पूर्तता याबरोबरच दोन सिलिंग पंखे अशा स्वरुपाची भरीव मदत उपलब्ध करुन देण्यात आली. डॉ.रवींद्र गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या उपक्रमात आश्रमाच्या छात्रावास पालक प्रिया आचवल, विवेक फोफावणे, सुभाष हांडे देशमुख, जी.आर.पाटील, अशोकराव महाजन, दत्तात्रय आंब्रे, दिलीपराव चिंचोळे, रवींद्र कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गतच सिद्धिविनायक केअर सेंटर तुर्भे स्टोअर यांच्यातर्फे आश्रमातील सर्व मुलांची शारीरिक तपासणी, उपचार, चिकित्सा व आवश्यक त्यांना औषधे देण्यात आली. डॉ.रवींद्र गोसावी यांनी यावेळी यूथकौन्सिल संस्थेच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करुन विद्यार्थ्यांना शरीर स्वास्थ्या विषयी सखोल मार्गदर्शन केले. आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी. हे विशद करताना, त्यांनी सांगितले की, आपला सगळ्यात जवळचा मित्र म्हणजे आपले शरीर व आपले आरोग्य हेच आहेत. त्याची व्यवस्थित काळजी घ्यायला हवी. त्यासाठी स्वच्छता राखणे खूप महत्त्वाचे आहे. आरोग्याचे तीन प्रकार सांगताना आपण आपल्या शरीराची काळजी घेणे, मानसिक आरोग्य जपणे, सामाजिक आरोग्य यांचे स्पष्टीकरण करतानाच सांगितले की माणूस हा सवयीचा गुलाम आहे. त्यामुळे चांगल्या सवयी लावा व आरोग्य सुंदर करा असा सल्ला डॉक्टरांनी मुलांना दिला. सुप्रिया आचवल यांनी आश्रमाची सखोल माहिती देऊन सांगितले. येथे मुलांच्या शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. स्वावलंबन, शिस्त, शारीरिक आरोग्य व खेळ आणि आधुनिक शैक्षणिक प्रगती याकडे लक्ष दिले जाते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आणि कौटुंबिक वातावरणातून आलेली ही मुले येथून दहावी पास होऊन जाताना समाजात सक्षमपणे स्वतः च्या पायावर उभी राहावीत यासाठी प्रयत्न केले जातात.

या कार्यक्रमात चिंचवली केंद्रातून शालांत परीक्षेत प्रथम आलेले व परीक्षेत सारखी मार्क्स पडलेले विठ्ठल विष्णू पारधी व स्वप्निल महादेव वाक या विद्यार्थ्यांचा गुच्छ व आर्थिक मदत देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका मीराताई पाटील यांनी शालेय साहित्य, डॉ.रवींद्र गोसावी यांनी औषधे तर डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ.जी.एस.नंदा, प्रकाश वामनराव पवार, शशिकांत देशपांडे, रवींद्र कांबळे, नितीन देशपांडे यांनी सक्रिय सहभाग घेऊन वस्तू व आर्थिक स्वरूपातील मदत उपलब्ध करुन देऊन उपक्रम अधिक प्रशंसनीय आणि अधोरेखित केला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष हांडे देशमुख यांनी नेटके केले. प्रिया आचवल यांनी आभार मानले तर विजयराव निंबाळकर, जयेश भावसार तसेच सिद्धी विनायक केअर सेंटर मधील सेवकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अपूर्व मेहनत घेतली.

## जागतिक सर्प दिनाच्या निमित्ताने सर्प शिक्षा अभियान संपन्न




**अक्षराज : उद्धव आटोळे**

**दि.१६, लोणार (बुलडाणा) :** जागतिक सर्प दिनाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी सापा विषयी माहिती व्हावी व त्यापासून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचं काम बुधवार, दिनांक १६ जुलै २०२५ रोजी निसर्ग फाउंडेशनच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल लोणार मध्ये करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर डोळे होते, तर मुख्य अतिथी म्हणून पर्यवेक्षक नंदकिशोर सांगळे हे होते. यावेळी निसर्ग फाउंडेशनच्या वतीने विनय कुलकर्णी यांनी विषारी सापांची ओळख करून दिली तर सचिन कापुरे यांनी बिनविषारी सापां बद्दल माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. त्यानंतर विनय कुलकर्णी यांनी परत महाराष्ट्रात आढळणाऱ्या सांपाविषयी सखोल माहिती देत विद्यार्थ्यांची सापाबद्दलची भीती दूर करत साप दिसला की आम्हा सर्प मित्रांना फोन करण्याचा आव्हान त्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांना आपला दूरध्वनी (मोबाईल) क्रमांक यावेळी सांगितला. या सर्व कार्यक्रमांमध्ये त्यांच्यासोबत बंटी नरवडे, चंदू अंभोरे, प्रतीक सुसर, ऋषिकेश घाटोळकर, समीर पटेल, रेहान शेख, वैभव बाभूळवार, विलास खरात, उमेद चिपडे व मंडळ अधिकारी संतोष जाधव हे आवर्जून उपस्थित होते. हा कार्यक्रम त्यांनी फक्त लोणारच नव्हे तर पुतळाबाई हायस्कूल लोणार श्री शिवाजी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, मोप याठिकाणी सुद्धा संपन्न झाला. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण इंगळे यांनी केलं तर आभार प्रदर्शन विशाल थोरवे यांनी मानले.